# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- पारीत ठराव क्रमांक १०५७/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक २५/०९/२०२४.

**{स.वि.वि.}** केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVANidhi) योजने अंतर्गत स्वनिधी से समृद्धी योजनेकरिता पात्र पथ विक्रेत्यांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करून विविध ८ योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याकरिता संस्था / कंपनीची नेमणूक करण्याकरिता https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात आली होती. ई-निविदेच्या माध्यमातून ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीला रू. १२३.५०/- प्रती लाभार्थी या दराप्रमाणे २७,९८४ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता दिनांक ३०/०९/२०२४ रोजी कार्यादेश देण्यात आले होते. सदर कार्याकरिता पारीत ठराव क्रमांक १०५७/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक २५/०९/२०२४ अन्वये रू. ३४,५६,०२४/- इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. परंतु ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीने २७,९८४ पैकी कार्यादेश कालावधीत फक्त ३८१३ इतक्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. तद्नंतर तत्कालीन मा. अति. आयुक्त (शहर) यांनी दिलेल्या निर्देशान्वये ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीला दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु सदर कंपनीने मुदतवाढ दिलेल्या कार्यकाळात सुद्धा एकही सर्वेक्षण केले नाही. करिता सदर कंपनीचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक दिनांक १३/०२/२०२५ रोजी सदर योजनेच्या आढावा बैठकीत सदर योजनेच्या आढावा बैठकीत जास्तीत जास्त सर्वेक्षक कार्यक्षेत्रात उपलब्ध करून द्यावे व याकरिता ई-निविदा काळात ज्या संस्था / कंपनी यांनी आवेदन सादर केले होते, अथवा ज्या संस्थांनी यापूर्वी सर्वेक्षणाचे कार्य केले आहे. अशा संस्था / कंपनी तसेच दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापन शहर स्तर संस्था यांना L1 असलेल्या संस्था / कंपनी यांच्या दरावर (रू. १२३.५०/- प्रति पथविक्रेता) कार्य करण्यास इच्छूक असल्यास यांना कार्यादेश देण्याबाबत सूचित केले होते.

सदर सर्वेक्षणाचे कार्य पूर्ण न केल्याने ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत व ई-निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या १. इनोव्हेशन्स सोल्युशन & इव्हेंट्स प्रा. लि., नागपूर २. सह्याद्री ग्रामीण विकास व बहुउद्देशीय युवक कल्याण संस्था, नागपूर तसेच ३. सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्र, नागपूर या तीन संस्थांना ई-निविदेत नमूद अटी व शर्तीच्या आधारावर रू. १२३.५०/- प्रती लाभार्थी या दराप्रमाणे समप्रमाणात वाटप करून (८०५७ प्रमाणे) तीन महिन्याच्या आत सर्वेक्षण पूर्ण करण्याकरिता कार्यादेश देऊन, करारनामा करण्याबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक ११/०४/२०२५ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअनुषंगाने प्रलंबित असलेल्या २४,१७१ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता रू. १२३.५०/- प्रती लाभार्थी या दराप्रमाणे एकूण रू. २९,८५,११९/- (अक्षरी- रूपये एकोणतीस लक्ष पंच्यांशी हजार एकशे एकोणवीस फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी, तसेच उक्त नमूद ३

संस्थांना समप्रमाणात वाटप करून (८०५७ प्रमाणे) कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेऊन मान्यता प्रदान करण्यास्तव सादर प्रस्तुत.

टिप :- १) सदर खर्च म.न.पा. अर्थसंकल्पात सन २०२५-२०२६ अंदाजपत्रकातील पद क्र. A-47702474617 मधून करण्यात येईल.

२) सविस्तर माहिती नस्ती सोबत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 20/**स्थायी समिति/प्रशासक** **दिनांक :-** 15/04/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, समाज विकास विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार पारीत ठराव क्रमांक १०५७/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक २५/०९/२०२४.

केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVANidhi) योजने अंतर्गत स्वनिधी से समृद्धी योजनेकरिता पात्र पथ विक्रेत्यांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करून विविध ८ योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याकरिता संस्था / कंपनीची नेमणूक करण्याकरिता https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात आली होती. ई-निविदेच्या माध्यमातून ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीला रू. १२३.५०/- प्रती लाभार्थी या दराप्रमाणे २७,९८४ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता दिनांक ३०/०९/२०२४ रोजी कार्यादेश देण्यात आले होते. सदर कार्याकरिता पारीत ठराव क्रमांक १०५७/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक २५/०९/२०२४ अन्वये रू. ३४,५६,०२४/- इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. परंतु ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीने २७,९८४ पैकी कार्यादेश कालावधीत फक्त ३८१३ इतक्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. तद्नंतर तत्कालीन मा. अति. आयुक्त (शहर) यांनी दिलेल्या निर्देशान्वये ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीला दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु सदर कंपनीने मुदतवाढ दिलेल्या कार्यकाळात सुद्धा एकही सर्वेक्षण केले नाही. करिता सदर कंपनीचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच मा. आयुक्त तथा प्रशासक दिनांक १३/०२/२०२५ रोजी सदर योजनेच्या आढावा बैठकीत सदर योजनेच्या आढावा बैठकीत जास्तीत जास्त सर्वेक्षक कार्यक्षेत्रात उपलब्ध करून द्यावे व याकरिता ई-निविदा काळात ज्या संस्था / कंपनी यांनी आवेदन सादर केले होते, अथवा ज्या संस्थांनी यापूर्वी सर्वेक्षणाचे कार्य केले आहे. अशा संस्था / कंपनी तसेच दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापन शहर स्तर संस्था यांना L1 असलेल्या संस्था / कंपनी यांच्या दरावर (रू. १२३.५०/- प्रति पथविक्रेता) कार्य करण्यास इच्छूक असल्यास यांना कार्यादेश देण्याबाबत सूचित केले होते.

सदर सर्वेक्षणाचे कार्य पूर्ण न केल्याने ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड, इंदौर या कंपनीचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत व ई-निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या १. इनोव्हेशन्स सोल्युशन

& इव्हेंट्स प्रा. लि., नागपूर २. सह्याद्री ग्रामीण विकास व बहुउद्देशीय युवक कल्याण संस्था, नागपूर तसेच ३. सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्र, नागपूर या तीन संस्थांना ई-निविदेत नमूद अटी व शर्तीच्या आधारावर रू. १२३.५०/- प्रती लाभार्थी या दराप्रमाणे समप्रमाणात वाटप करून (८०५७ प्रमाणे) तीन महिन्याच्या आत सर्वेक्षण पूर्ण करण्याकरिता कार्यादेश देऊन, करारनामा करण्याबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक ११/०४/२०२५ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअनुषंगाने प्रलंबित असलेल्या २४,१७१ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता रू. १२३.५०/- प्रती लाभार्थी या दराप्रमाणे एकूण रू. २९,८५,११९/- (अक्षरी- रूपये एकोणतीस लक्ष पंच्यांशी हजार एकशे एकोणवीस फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी, तसेच उक्त नमूद ३ संस्थांना समप्रमाणात वाटप करून (८०५७ प्रमाणे) कार्यादेश देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.